# मा. मंत्री (वित्त, नियोजन आणि वने) श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी शुक्रवार, दिनांक १८ मार्च २०१६ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये.

## भाग–दोन

- शासनाच्या धोरणाप्रमाणे साखर निर्यात करणाऱ्या साखर कारखान्यांना सन २०१५-१६चा ऊस खरेदी कर माफ.
- व्यवसाय कर कायद्याखाली नावनोंदणी धारकासाठी अभय योजना. करदायित्व आणि शास्ती अनोंदीत कालावधीच्या मागील तीन वर्षापर्यंत सीमित.
- विक्रीकर विभागाकडून राबविली जाणारी अभय योजना. ३१ मार्च २००५ पूर्वीच्या कालावधीसाठीच्या विवादीत व थकीत रकमेपैकी कराची पुर्ण रक्कम भरल्यास व्याज व शास्तीची संपुर्ण सूट. दिनांक १ एप्रील २००५ ते ३१ मार्च २०१२ पर्यंतच्या कालावधीतील विवादीत व थकीत रकमेपैकी कराची संपुर्ण रक्कम भरल्यास व व्याजाची २५ टक्के रक्कम भरल्यास उर्वरित व्याज व संपुर्ण शास्तीची सूट.
- वस्त्रोद्योगाला प्रोत्साहन म्हणून वार्पिंग व सायझिंग प्रक्रीयेला मूल्यवर्धित करातून माफी.
- किरकोळ विक्रेत्यांना लागू असलेल्या आपसमेळ योजनेखालील उलाढालीची मर्यादा रु. ५० लक्ष वरुन रु. १ कोटी.
- ब्रेस्ट कॅन्सरच्या तपासणीसाठी आवश्यक असलेल्या मॅमोग्राफी मशीनवर विक्रीकराची सूट
- इंजेक्शनसाठीचे निर्जंतुक पाण्यावर कराचा दर १२.५% वरुन ५.५%.
- बेकरी उद्योगासाठी लागू असलेल्या आपसमेळ योजनेखालील उलाढालीमधून कर मुक्त वस्तुंची उलाढाल वगळली.
- दिव्यांग व्यक्तीसाठीच्या वाहनांकरिता बसविण्याच्या Retrofit Kit च्या विक्रीवरील कर माफ.
- एल. इ. डी. ट्युब वरील विक्रीकर १२.५ टक्के वरुन ५.५ टक्के.
- पायरोलिसिस ऑईलच्या विक्रीवरील विक्री कर १२.५ टक्के वरुन ५.५ टक्के.
- CRPF आणि BSF च्या सशस्त्र कर्मचाऱ्यांना व्यवसाय करातून माफी.
- अनुदानीत शैक्षणिक सस्थांकडून ई - विवरणपत्र दाखल न केल्याबाबतचे विलंब शुल्क माफ.

- स्टिलची बार्ब्ड वायर, वायर मेश आणि चेन लिंक यावरील कराचा दर १२.५ टक्के वरुन ५.५ टक्के.

- विद्यार्थ्यांच्या उपयोगी पेन्सिल बॉक्स, स्टेपलर पिन्स, डस्टर, डिंक इ. वस्तुंवरील कराचा दर १२.५ टक्के वरुन ५.५ टक्के.

- बांबूपासुन बनविलेल्या फर्निचर व्यतिरीक्त हस्तकला उत्पादनांच्या विक्रीवरील विक्रीकर माफ.

- पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या बंद उद्योग घटकांसाठीची उद्योग धोरणाखाली अभय योजना वर्ष २०१६-१७ मध्ये नव्याने राबविणार.

- लॉजिस्टीक व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी लॉजिस्टिक हबची स्थापना करणार व या हब मधून होणाऱ्या आंतरराज्य विक्रीवरील केंद्रीय विक्रीकर माफ करणार.

- मूल्यवर्धित कर कायद्याखालील ५ टक्के करदराच्या वस्तुंवरील (घोषित वस्तु वगळून) ५ टक्के कराचा दर वाढवून तो ५.५ टक्के.

- वैयक्तीक वापराच्या दुचाकी व तीन चाकी वाहनांवर इंजिन क्षमतेच्या आधारित मोटार वाहन कर आकारणी-९९ सी.सी. पर्यंत-८ टक्के, १०० सी.सी. ते २९९ सी.सी.-९ टक्के, ३०० सी.सी. व त्यापेक्षा जास्त-१० टक्के. कंपनी व महामंडळे याच्या नावे असलेल्या तसेच इंपोर्टेड वाहनांवरील मोटार वाहन कर दुप्पट.

- रु. ३ कोटींवरील विक्रीची उलाढाल असलेल्या हॉटेल्स व रेस्टॉरेंटसाठी आपसमेळ योजेनखाली कराचा दर ८ टक्के.

- मार्बल व ग्रॅनाईटच्या स्लॅब्सवर प्रवेश कराची आकारणी.

- ऑनलाईन लॉटरी ड्रॉ वरील करामध्ये वाढ.

- ५०० मि.ली. पर्यंत पॅक केलेल्या खोबरेल तेलावरील ५ टक्के कराचा दर वाढवून १२.५ टक्के.

- विक्रीकर कायद्यांखालील विवादीत प्रश्नांचा जलद निपटारा होण्यासाठी आगाऊ अधिनिर्णय प्राधिकारणाची स्थापना.

- व्यापाऱ्यास इनपुट टॅक्स लेजर उपलब्ध होणार.

- संगणकीय देयके (Digital Billing) पध्दतीचा अवलंब करण्यासाठी विक्रीकर विभागाकडून पथदर्शी प्रकल्प राबविणार.

*****